राज्यातील दुष्काळ (Trigger-१) जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांतील लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०२६/प्र.क्र.५०/ना.पु.२२,**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०९ ऑक्टोबर, २०२६.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. असुका २०१३/प्र.क्र.३१९/ नापु-२२, दि. १७ डिसेंबर, २०१३.
२) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. असुका २०१४/प्र.क्र.११६/ नापु-२२, दि. २४ मार्च, २०१५.
३) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. अधापु २०१४/प्र.क्र.१२२/ नापु-२२, दि. १५ जानेवारी, २०१६.
४) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. असुका २०१६/प्र.क्र.१२५/ नापु-२२, दि. १३ ऑक्टोबर, २०१६.
५) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. असुका २०१७/प्र.क्र.६०/ नापु-२२, दि. ३ मार्च, २०१७.
६) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. असुका २०१८/प्र.क्र.१/ नापु-२२, दि. २१ मे, २०१८.
७) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. असुका २०१८/प्र.क्र.१३२/ नापु-२२, दि. १६ नोव्हेंबर, २०१८.
८) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील रिट याचिका (सिव्हिल) क्र. ८५७/२०१५ मधील आदेश दि. १३ मे, २०१६.
९) शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग, क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/ मदत-२, दि. २५ सप्टेंबर, २०२६.

**प्रस्तावना :-**

मदत व पुनर्वसन विभागाच्या संदर्भाधीन दि. २५ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये खरीप २०२६ हंगामासाठी Trigger-१ (प्रथम कळ) लागू करून विविध सवलती व उपाययोजना घोषित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २(९) अन्वये दुष्काळग्रस्त भागातील शेतीवर आश्रित शेतकरी, शेतमजूर इत्यादी घटकांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, याकरिता प्रभावी व्यवस्था उभी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याद्दष्टीने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत गरजू लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरित करण्यात येते. यास्तव, संदर्भाधीन दि. २५ सप्टेंबर, २०२६ च्या शासन निर्णयानुसार दुष्काळ जाहीर झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांत अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत खालीलप्रमाणे प्राधान्याने कार्यवाही करावी:-

१. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा विनाविलंब व सुरळीतपणे उपलब्ध करण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी.

२. APL DBT योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना नियमितपणे देण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

३. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेशन व आधार सिडिंग :- सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळ (Trigger-१) जाहीर केलेल्या २६५ तालुक्यांमधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या कोणत्याही व्यक्तीने, मोफ़त अन्नधान्याची मागणी केल्यास, त्या व्यक्तीचा, संदर्भाधीन अ.क्र.१ येथील दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित निकषांनुसार, त्यांच्या उत्पन्नाच्या व उपलब्ध इष्टांकाच्या मर्यादेत, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंब प्रवर्गात समावेश करून व शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांचे आधार सिडिंग पूर्ण करून त्यांना तात्काळ अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

४. AePDS व PoS उपकरणांद्वारे पोर्टेबिलिटी (Portability) सुविधेचा लाभ :- सद्य:स्थितीत, राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील पात्र लाभार्थ्यांना बायोमेट्रीक ओळख पटविल्यानंतर e-Pos यंत्राद्वारे अन्नधान्याचे वितरण केले जात आहे. राज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या नोंदी AePDS प्रणालीवर उपलब्ध असून ई-पॉस (PoS) यंत्राद्वारे "वन नेशन वन रेशन कार्ड" अंतर्गत Portability ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांतून शेतमजूर व नागरिकांचे रोजगार किंवा पाण्यासाठी शहरी, निमशहरी अथवा नजीकच्या भागात स्थलांतर होण्याची शक्यता असते. अशा स्थलांतरित नागरिकांना त्यांच्या नेमून दिलेल्या रास्तभाव दुकानाव्यतिरिक्त इतर कोणत्याही सोयीच्या रास्तभाव दुकानातून अन्नधान्य उचल करता यावे, यासाठी Portability सुविधेची काटेकोर अंमलबजावणी करावी. स्थलांतरामुळे एकही पात्र कुटुंब अथवा लाभार्थी हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्तिगत दक्षता घ्यावी.

५. मिशन सुधारअंतर्गत त्या-त्या जिल्ह्यातील रद्द झालेल्या शिधापत्रिकांचा इष्टांकदेखील विचारात घेऊन दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभधारकांना शिधापत्रिका देण्यात यावी.

६. दक्षता व नियंत्रण: - राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अन्नधान्याची उचल व वितरण विहित मुदतीत पूर्ण होण्याच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी आगाऊ नियोजन करावे. तसेच, सदर योजनेंतर्गत अन्नधान्याचा काळाबाजार, अवैध साठेबाजी किंवा गैरव्यवहार होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००९१२१०५८१८०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=1D60828C41033AB1DA6D64EF17879745D578B334C05C1E8151EF933F134060BC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2026.10.09 12:11:58 +05'30'

**( संतोष गायकवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्रालयीन विभाग.
८. सर्व विभागीय आयुक्त (महसूल).
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
११. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१२. सर्व उपायुक्त (पुरवठा).
१३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
१४. सर्व तहसीलदार.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी).
१६. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).